"ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षि डॉ. बापुजी साळुंखे

(स्वायत्त) कोल्हापूर

❖ भारताचे नवीन आर्थिक धोरण

# विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

(स्वायत्त)

## -राज्यशास्त्र विभाग

❖ **विद्यार्थी-** दाभोळकर प्रतिक विजय, पवार पूजा अर्जुन, पोवार आकांक्षा कृष्णात, साळोखे शुभम भारत, सुतार सुमित अशोक.

❖ **मार्गदर्शक- डॉ.समीक्षा फराकटे** (राज्यशास्त्र विभागप्रमुख)

[वर्ष-2021-22]

## ➤ आर्थिक धोरण-

सरकारच्या आर्थिक धोरणामध्ये कर आकारणीचे स्तर,सरकारी बजेट,पैशाचा पुरवठा आणि व्याजदर,श्रमिक बाजार राष्ट्रीय मालकी व अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेपाची इतर अनेक क्षेत्रे निश्चित करण्यासाठीच्या प्रणालीचा समावेश होतो.

आर्थिक धोरणाचे बहुतेक घटक एकतर राजकोशीय धोरणात विभागले जाऊ शकतात. जे कर आकारणी आणि खर्चासबंधी सरकारी कृतीशी संबंधित असतात किंवा चलनविषयक धोरण जे चलन पुरवठा व व्याजदराशी केंद्रीय बँकेच्या (RBI) कृतीशी संबंधित असतात.

राजकोशीय धोरण आणि चलन विषयक धोरण दोन्हीचा उपयोग करून सरकार व मध्यवर्ती बँक बाजारातील पैसा नियंत्रित करत असतात.

## ➢ १९९१ च्या आधीची भारताची स्थिति-

**१९९१ च्या आधी भारतीय अर्थव्यवस्था बंदिस्त स्वरूपाची होती. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडलेली नव्हती.१९९१ चे आर्थिक संकट मुख्यतः तीन घटकांच्या संबंधित होते.**

**१) राजकोषीय संकट**

**२)अनियंत्रित व्यवहारतोलचा प्रश्न**

**३)चलन वाढीचा जास्तदर**

- राजकोशीय संकट-

**१९८० च्या दशकात राजकोशीय परिस्थिति खराब होत गेली. केंद्र शासनाची राजकोशीय तूट १९८०-८१ मधील जीडीपी च्या ६.३% वरुन १९८९-९० मध्ये ८.२% पर्यंत वाढली होती. ही तूट भरून्न काढण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणात अंतर्गत व परकीय कर्ज घेतली होती. अंतर्गत कर्जाचे प्रमाण १९८०-८१ मधील**

जीडीपी च्या ३५% वरुन १९९०-९१ मध्ये ५३% पर्यंत वाढले होते.या कर्जावरील व्याज खर्च ही मोठ्या प्रमाणात वाढत गेला.

- अनियंत्रित व्यवहारतोलचा प्रश्न-

१९७० व १९८० च्या दशकामध्ये सरकारने आयातीवर आधारित औद्योगीकरण व उत्पादनाच्या धोरणावर भर दिल्याने आयातिचे प्रमाण प्रचंड वाढले,मात्र निर्यात तेवढ्या प्रमाणात वाढू शकली नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय देयता वाढली,मात्र आवक खूपच कमी होती.त्यामुळे चालू खात्यावरील तूट वाढली ती भरून काढण्यासाठी सरकारने भरमसाठ परकीय कर्ज घेतली होती.

- चलन वाढीचा जास्तदर-

सलग ३ वर्षे मान्सून अनुकूल असतानाही घाऊक किंमतीचा निर्देशांक (WPI) १९८५-८६ मधील ४.५% वरून १९९०-९१ मध्ये १०% पेक्षा अधिक झाला होता. वाढत्या तुटी,तुटीचे चलणीकरण व त्यामुळे चलन पुरवठयातील अतिरिक्त वाढ,यामुळे ही चलनवाढ घडून आली होती.

याव्यतिरिक्त,संरचनात्मक दोषही निर्माण झाले होते.

- कृषि क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील व श्रम लोकसंख्येतील मोठा हिस्सा,मात्र अल्प वाढीचा दर.

- License-permit-inspection raj व्यवस्था: ज्या अंतर्गत सर्व उद्योगाना सरकारकडे नोंदणी आवश्यक,नवीन उद्योग स्थापनेसाठी परवाना,प्रस्थापित उद्योगाना नवीन वस्तूंच्या निर्मितीसाठी नवीन परवाना इत्यादि बंधने घालण्यात आली होती.

- सार्वजनिक क्षेत्र आरक्षण,लघु उद्योग क्षेत्र आरक्षण.

थोडक्यात अर्थव्यवस्थेतील जवळजवळ सर्व क्षेत्रे सरकारकडून कडकपणे नियंत्रित केली जात होती.


Rao



## ➢ १९९१ चे आर्थिक संकट –

समाजवादी नियोजनाचे तत्व,अर्थव्यवस्थेतील सरकारचे नियंत्रण,संरचनात्मक ताठरपणा,आयातीवरील निर्बंध व अवलंबीत्व या अंतरविरोधी दर्शवणाऱ्या बाबीमुळे टप्याटप्याने भारतीय अर्थव्यवस्था १९९१ मध्ये आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली.

- १९९०-९१ मध्ये भारताचा GDP वृद्धी दर ५.३% पर्यंत कमी झाला.
- १९९०-९१ मध्ये चलन वाढीच्या दराने १३.७% हा गेल्या ३० वर्षातील उच्चांक गाठला.
- राजकोशीय तूट ८.४% झाली.
- परकीय साठा ५.८ BD पर्यंत खाली आला. जून १९९१ पर्यंत ०.८ BD पर्यंत खाली घसरला.
- सरकार वरील कर्जाचे प्रमाण GDP च्या तुलनेत ५५.३% इतका झाला होता.

यामुळे १९९०-९१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था दिवाळखोर बनली.

## ➢ IMF आणि WORLD BANK चे आगमन -



मोठे परकीय कर्ज भारताला वाचवू शकणार होते. ही कर्ज घेण्यासाठी शेवटचा स्त्रोत होता IMF. त्यांच्याकडे भारताची जेवढी पत होती तेवढे कर्ज घेऊन झालेले होते. पतपलिकडे कर्ज पाहिजे असल्यास IMF च्या Extended fund facility अंतर्गत घेत येते. चंद्रशेखर सरकारने कर्जाची मागणी केली. या कर्जासाठी भारताने दोन गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक होते.

१)तारण - १९९१ मध्ये तारण म्हणून ४७ टन सोने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपान मध्ये व २० टन सोने बँक ऑफ स्वित्झर्लंड येथे असे ६७ टन सोने sale with a repurchase या तत्वावर तारण म्हणून पाठवले. यावर बँकानी भारताला कर्ज

दिले,तसेच IMF ने भारताला ४.७ BD इतके कर्ज दिले.



२)आश्वासन - आश्वासन होते कर्ज फेडण्याचे. यासाठी भारताला अर्थव्यवस्थेस स्थैर्य प्राप्त करून देणे व संरचनात्मक सुधारणा करणे गरजेचे होते. यासाठी भारताने उदारीकरण खाजगीकरण जागतिकीकरण (उ-खा-जा) धोरण राबविले.

- स्थैर्य कार्यक्रम -

यासाठी अल्पकालीन 'स्थैर्य कार्यक्रम' हाती घेण्यात आला,ज्यामध्ये पुढील तीन बाबींवर प्रमुख भर होता.

१) राजकोशीय तूट कमी करणे.

२) व्यवहारतोलात स्थैर्य निर्माण करणे.

३) चलन वाढीवर नियंत्रण प्रस्थापित करणे.

- संरचनात्मक बदल -

यासाठी दीर्घकालीन 'संरचनात्मक समायोजन कार्यक्रम' हाती घेण्यात आला.यासाठी उदारीकरण-खाजगीकरण-जागतिकीकरण ची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

> *"There is no time to lose. Neither the Government nor the economy can live beyond its means year after year. The room for manoeuvre, to live on borrowed money or time, does not exist any more.... We need to expand the scope and the area for the operation of market forces."*
>
> —
>
> **Dr.Manmohan Singh.**
> **Budget Speech,**
> **July 24, 1991.**

## उदारीकरण -

सरकारने अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर टाकलेली बंधने कमी करणे,काढून टाकणे किंवा शिथिल करण्याची प्रक्रिया म्हणजे उदारीकरण होय.

- नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या जागी बाजारभिमुख,खुल्या व मुक्त स्पर्धेवर आधारित अर्थव्यवस्था ही उदरीकरणाच्या प्रक्रिये मागील मूळ संकल्पना आहे.
- या धोरणाने जवळ जवळ ८५% क्षेत्र परवाना मुक्त केले. सध्या फक्त ५ गोष्टीसाठी औद्योगीक परवाना लागू आहे -मद्य उत्पादन,तंबाखूजन्य पदार्थ उत्पादन,संरक्षक साधने, औद्योगीक स्फोटके आणि घातक रसायने.
- नवीन धोरनाद्वारे सरकारने निर्गुणतवणुकीच्या माध्यमातून सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण सुरू केले.
- परकीय व्यापार सुधारणा करण्यात आली. परकीय चलन विनिमय कायदा (FERA) सुधारून परकीय चलन व्यवस्थापन कायदा (FEMA) अस्तित्वात आला.

## खाजगीकरण -


सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची मालकी अंशत: किंवा पूर्णत: खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणत येईल. सार्वजनिक क्षेत्राची कामगिरी उंचावणे आणि त्याद्वारे कायद्यावरील त्याचा वित्तीय भर कमी करणे हे खाजगीकरणाचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

- फायदे -१. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाना त्यांच्या खऱ्या उत्पादन क्षमतेची जाणीव झाली.

  २. सरकार स्वतः व्यावसायिक होण्याएवजी व्यवसायांचे योग्य नियंत्रण करू शकेल.

• तोटे -१. समाजकल्यानाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता,तसेच कामगारांचा प्रश्न निर्माण होऊ शकेल.

२. संपतीचे केंद्रीकरण होऊन आर्थिक विषमता वाढण्याची शक्यता.



## जागतिकीकरण -

जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेचे एकात्मिकरण होय. म्हणजेच या प्रक्रियेत जगातील देशादरम्यान वस्तु,सेवा,भांडवल,तंत्रज्ञान आणि माहिती इत्यादीबाबत वाढती आर्थिक मदत निर्माण होते आणि मुक्त व्यापराची स्थिति निर्माण केली जाते.

जगतिकीकरणाचे प्रक्रियेमुळे संपूर्ण विश्व एक 'वैश्विक ग्राम' बनेल,जी प्रक्रिया भारताच्या 'वसुधैव कुटुंबकम' या विचारसारणीशी सुसंगत आहे.

- जगतिकीकरणाचे चार घटक -

१. वस्तु व सेवांचा मुक्त प्रवाह

२. भांडवलाचा मुक्त प्रवाह

३. तंत्रज्ञानाचा मुक्त प्रवाह

४. श्रमाचा मुक्त प्रवाह


*" I do not minimise the difficulties that lie ahead on the long and arduous journey on which we have embarked. But as Victor Hugo once said, "No power on earth can stop an idea whose time has come". I suggest to this august House that the emergence of India as a major economic power in the world happens to be one such idea. Let the whole world hear it loud and clear. India is now wide awake. We shall prevail. We shall overcome."*


—


***Dr.Manmohan Singh.***

***Budget Speech,***


***July 24, 1991***


India GDP Growth 1950-2010
80,000,000
70,000,000
60,000,000
50,000,000
40,000,000
30,000,000
20,000,000
10,000,000
0
1950
1955
1960
1965
1970
1975
1980
1985
1990
1995
2000
2005
2010


Chart I : Movements in Foreign Exchange Reserves
US$ billion
180
160
140
120
100
80
60
40
20
0
Mar-91
Mar-92
Mar-93
Mar-94
Mar-95
Mar-96
Mar-97
Mar-98
Mar-99
Mar-00
Mar-01
Mar-02
Mar-03
Mar-04
Mar-05
Mar-06


FDI (inwards) in India
in USD Billions
180
160
140
120
100
80
60
40
20
0
1993
1995
1997
1999
2001
2003
2005
2007
2009


WELCOME
RETAIL TRADE


Sector contribution to GDP (%)
70
60
50
40
30
20
10
0
1950
1960
1970
1980
1990
2000
2010
Services
59
Industry
27
Agriculture
14


ECONOMIC REFORMS PLANTED BY MR SINGH
20 YRS LATER...
MANJUL

# THANK YOU...

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

प्रमाणित करण्यात येते की,

# प्रमाणपत्र

विद्यार्थ्यांची नावे:-

१. प्रतिक विजय दाभोलकर
२. पूजा अर्जुन पवार
३. आकांक्षा कृष्णात पोवार
४. शुभम भारत साळोखे
५. स्मित अशोक सुतार

(बी. एं. भाग ३)

२०२१-२२ या शैक्षणिक वर्षात राज्यशास्त्र (भारतीय परराष्ट्र धोरण) या पेपर अंतर्गत 'भारताचे नवीन आर्थिक धोरण' या विषयावर प्रकल्प पूर्ण केला आहे.

मार्गदर्शक:

प्रा. समीक्षा फराकटे

HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Topic :  Page :  Date :

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार
- शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

विभाग-: राजशास्त्र

बी.ए. भाग III    वर्षे-2021-2022

प्रकल्प विषय-: 73 वी घटनादुरुस्ती अंमलबजावणी

पेपर क्र. 12    रोल नं 5619

मार्गदर्शक-:

प्रा.डी.ए.पवार    प्रा. समीक्षा फराकटे

BEN 10
colors
GOLD PPCG_10

Topic :

Page :
Date :

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्व घोषित करतो की, सदरचे संशोधन कार्य आमच्या स्वत:च्या प्रयत्नाचे फलीत आहे. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नसून आम्ही स्वत: संशोधन करून तसेच मार्गदर्शकाकडून मिळालेल्या माहितीवरून आणि संदर्भ साहित्याचा आधार घेऊन तयार करण्यात आले आहे.

ठिकाण -: विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक -: 5-7-2021

| अ.क्र | संशोधन विद्यार्थ्यांची नावे | रोल नंबर | सही |
|---|---|---|---|
| 1) | कु. सावंत वर्षा वसंत | 5616 | |
| 2) | कु. सावंत प्रतिक्षा किशोर | 5617 | |
| 3) | कु. शेवाळे मेहेक | 5618 | |
| 4) | कु. शिंदे शुभम रंगराव | 5619 | [signature] |
| 5) | कु शिंदे तेजस संभाजी | 5620 | |

10/10 [signature]

# ऋण निर्देक्षक

मी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयातंर्गत बी.ए. भाग ३ मधील "राज्यशास्त्र" या विषयातील 73 वी घटनादुरुस्ती अंमलबजावणी हा प्रकल्प सादर करण्यासाठी संधी मिळाली याबद्दल आम्ही शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद महाविद्यालयाचे ऋणी आहे. या प्रकल्पासाठी मला प्रा. डी. ए. पवार व प्रा समीक्षा फराकटे व ग्रंथपाल या सर्वांचे प्रोत्साहन व वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले लाभले, याबद्दल आम्ही ऋणी आहे. त्यामुळे ग्रंथालयातील सेवकांचेही मनापासून आभार.

Topic :
Page :
Date :

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शिर्षकाचे नाव | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १] | ७३ वी घटना दुरुस्ती | १ ते २ |
| २] | घटना दुरुस्तीचा मुख्य उद्देश | ३ |
| ३] | सर्व सामान्य माणसाला विकास काम व नियोजनात सहभाग देणारा कायदा | ४ ते ५ |
| ४] | ७३ व्या घटनेतील कायदयाची ठळक वैशिष्ट्ये | ६ ते ७ |
| ५] | ७३ व्या राज्य घटनेत करण्यात आलेला बदल | ८ |
| ६] | ७३ व्या घटनादुरुस्ती कायद्यानंतरही ग्रामीण शासनाची उद्दिष्टे साध्य न होणे | ९ ते १० |
| ७] | संदर्भसूची | ११ |


BEN 10
colors
GOLD
PPCG_10

Topic :

Page : 1

Date :

# ७३ वी घटना दुरुस्ती

देशाच्या विकासाच्या दृष्टीने पंचायत राज्याचे महत्त्व ओळखून त्याला आपल्या राजकीय कार्यक्रमात महत्त्वाचे स्थान देण्याचा निर्णय भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी घेतला. दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी केंद्र सरकारच्या योजना राज्य सरकार द्वारे व त्यांच्या सहभागानेच राबविणे शक्य होते. पंचायत राजव्यवस्थे-विषयी राज्य सरकारने उदासिन होती. देशातील लोक-शाही व्यवस्थेमध्ये "पंचायत राज्य व्यवस्थेला" स्वायत्त संस्था म्हणून स्थान द्यायचे असेल तर त्याच्या मुलभूत व्यवस्थेची तरतूद असणारी घटना दुरुस्ती करण्याचे नक्की ठरले. त्यासाठी ६४ वे घटना दुरुस्तीचे विधेयक लोकसभेपुढे मांडण्यात आले. लोकसभेने ते १९८९ च्या ऑगस्टमध्ये मंजुर केले. परंतु काँग्रेस या सत्ताधारी पक्षाला राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे ह्या विधेयकाला राज्य सभेची मंजुरी मिळाली नाही त्यानंतर त्यांनी ते विधेयक पुन्हा दुसऱ्यांदा १९९० च्या सप्टेंबर महिन्यात व्ही.पी सिंग यांच्या नेतृत्वा खालील राष्ट्रीय आघाडी सरकारने लोकसभेत मांडले. परंतु बिलावर चर्चा होण्यापूर्वी राष्ट्रीय आघाडी सरकार कोसळले व लोकसभा बरखास्त झाली. त्यामुळे हे विधेयक आपोआप बारगळले. त्यानंतर ते विधेयक पी.व्ही नृसिंहराव सरकारने सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत तिसऱ्यांदा मांडले. त्याला 22 डिसेंबर १९९२ रोजी मंजुरी दिली आणि दुसऱ्याच

BEN 10
colors
GOLD
PPCG_10

२३ डिसेंबर १९९२ रोजी राज्य सभेने ते मंजुर केले.

अशा तऱ्हेने केंद्र सरकारने पंचायत राज्य पद्धतीने बळकट करणारी ७३ वी घटना दुरुस्ती केली. राष्ट्रपतींनी त्या दुरुस्तीला २० एप्रिल १९९३ रोजी मान्यता दिली गेली आणि भारतात तीची अंमलबजावणी २४ एप्रिल १९९३ रोजी पासून सुरु झाली. केंद्र सरकारने राज्य सरकारांना पंचायती राज्य पद्धती सुरु करण्याकरिता करण्यासाठी सांगितले. लोकसभेने ७३वी ७४वी घटना दुरुस्ती कायदा केली.

colours
BEN 10
GOLD
PPCG_10

## घटना दुरुस्तीचा मुख्य उद्देश।

पंचायत राज्य संस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त करुण देणे हा ७३ व्या घटना दुरुस्ती कायद्याचे मुख्य उद्देश होता. या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज्य संस्थांना घटनात्मक संरक्षण मिळाले आहे. याचाच अर्थ असा ~~आहे~~ की केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याप्रमाणे हस्तक्षेप व मनमानी करू शकत नाही. पंचायत राज्य संस्थाच्या निवडणूका घेणे किंवा त्यांना अधिकार देणे या गोष्टी आता राज्य सरकारच्या मर्जीवर पूर्वी-प्रमाणे अवलंबून राहिलेल्या नाहीत. बऱ्याचशा वेळा राज्या-मध्ये शासन करणाऱ्या राजकीय पक्षांना निवडणूक घेण्याकरिता अनुकूल परिस्थिती नसल्यास स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकींना मुदतवाढ देऊन निवडणुका पुढे ढकलल्या जात असत. महाराष्ट्रात एकेकाळी निवडणुका तब्बल १२ वर्षानंतर घेण्यात आल्या ~~आहेत~~ होत्या. आता दर पाच वर्षानी निवडणुका घेण्याचे बंधन घालण्यात आले आहे. घटना दुरुस्तीमुळे राज्य घटनेमध्ये ज्या काही तरतुदी असतील त्यांचे पालन करणे राज्य सरकारांना बंधनकारक आहे.

सर्व सामान्य माणसाला विकास काम व नियोजनात सहभाग देणारा कायदा

२४ एप्रिल १९९३ या दिवसापासून ७३ वी घटना अंमलात आली. यामुळे भारतातील सर्व राज्यात गावपातळी, जिल्हापातळी आणि या दोन्हीमधील तालुका विकास गट पातळी अशी त्रिस्तरीय पंचायत राज्य पदधती सुरु झाली. महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषद वगैरेंचा १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने आणि १९६१ च्या जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदयाने ती अगोदर सुरु झाली होती. ७३ व्या घटना दुरुस्तीने त्यास घटनात्मक दर्जा मिळाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या क्षेत्रात सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात निर्णय घेण्याचे आणि अंमलबजावणी करण्याचे अधिकार या घटना दुरुस्तीने दिले. लोकांना आपल्या प्रतिनिधीक संस्थेच्या माध्यमातून अधिकार दिल्यास ते विकासाच्या म्हणजेच समाज परिवर्तनाच्या कामात सहभागी होतील. त्यांनी स्वत: निर्णय घेतल्यामुळे उत्तर दायित्वाची भावना निर्माण होईल, सामुदायिक कामांना चालना मिळेल आणि ग्रामीण भागातील व्यापक प्रमाणात स्थानिक नेतृत्वाचा उदय होईल असा या घटना दुरुस्तीचा उद्देश आहे. देशाच्या शासन व्यवस्थेमध्ये हा महत्त्वाचा टप्पा असून त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

BEN 10
colours
GOLD
PPCG_10

या घटना दुरूस्तीतील कलम २४३ अन्वये गावकारभारात लोकांचा सहभाग वाढावा या हेतूने ग्रामसभेचे आयोजन करणे हे ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच व ग्रामसेवक यांच्यावर बंधनकारक आहे. गावाच्या विकासाची दिशा व विचार केंद्र सरकारातील तसेच राज्य सरकारातील राज्यकर्त्यांपेक्षा गावातील स्थानिक, स्त्री, पुरुष आणिक चांगल्या पद्धतीने करू शकतात यावर कायद्याने ~~[struck-out word]~~ शिक्कामोर्तब केले.

colors
BEN 10
GOLD
PPCG_10

## 73 व्या घटनेतील कायद्याची ठळक वैशिष्ट्ये

73 व्या घटनेतील कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे –:

1] संपूर्ण देशासाठी ग्रामीण, मध्यम व जिल्हा पातळीवर अशी समान त्रिस्तरीय पंचायती राज्य-व्यवस्थेची तरतूद करण्यात आलेली आहे

2] ग्रामीण पातळीवर मतदार म्हणून नोंदणी केलेल्या सर्व व्यक्तींना समावेश या ग्रामसभेत केला जातो. राज्यशासनाने सोपविलेले अधिकार ग्रामसभेला वापरण्याचा अधिकार आहे.

3] या कायद्याद्वारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी त्या प्रदेशातील एकूण लोकसंख्येतील त्यांचे प्रमाण विचारात घेऊन काही जागा राखीव ठेवण्याची तरतूद क या कायद्याने करण्यात आलेली आहे. पंचायत राज्यसंस्थातील सर्व अध्यक्षपदे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवण्यात यावीत.

4] या कायद्याने पंचायती राज्यव्यवस्थेचा कार्यकाळ 5 वर्षे निश्चित केला आहे. पंचायती राज्यव्यवस्था विसर्जित केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करून नव्या संस्थेची स्थापना झाल्या पाहिजे.

5] विविध प्रकारचे शुल्क, कर इत्यादी लादण्याचा आधिकार पंचायतींना देण्यात आला आहे.

6] राज्यघटनेच्या ११व्या यादीमध्ये पंचायती राज्य संस्थांना ज्या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार आहेत, त्या २९ विषयांची विषयांची यादी पुढे दिलेली आहे या यादीत पंचायती राज्यसंस्थावर खाली नमुद केलेली कामे सोपवण्यात आली आहे.

कामाची यादी पुढीलप्रमाणे-: शेती, जमीन सुधारणा, पाणी, व्यवस्थापन, पाटबंधारे, पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मस्त्यपालन, सामाजिक वनीकरण व वनशेती, लघुउद्योग प्रक्रिया आणि खाद्यपदार्थ, खादी व ग्रामोद्योग, ग्रामीण घरबांधणी, पिण्याचे पाणी, समाजकल्याण, इंधन व चारा, रस्ते, नाले, पूल, होडी वाहतूक या व इतर कामांचा समावेश होतो.

इत्यादी ७३व्या घटनेतील कायद्याची ठळक वैशिष्ट्ये आहे.

# ७३व्या राज्य घटनेत करण्यात आलेला बदल

७३व्या घटना दुरुस्ती कायद्याने पंचायती या शिर्षकाखाली "भाग ९-अ" हा नवा भाग राज्य घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळेच कलम २४३ ते कलम २४३-ओ अशी कलमे समाविष्ठ केलेली आहेत. याशिवाय या कायद्याने राज्य घटनेला ११ वे परिशिष्ट जोडले असून त्यामध्ये पंचायत राज्य संस्थांच्या अधिकार कक्षेत येणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे

७३व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज्यांची स्थापना करण्याचे बंधन प्रत्येक राज्यावर घातले आहे. त्यामुळे पंचायत राज्याची स्थापना ही आता राज्याची "घटनात्मक जबाबदारी" ठरली आहे. राज्य घटनेच्या २४३-बी या कलमान्वये राज्यामध्ये ग्राम, मध्य व जिल्हा स्तरावर पंचायतीची स्थापना करता येईल. मात्र ज्या राज्यांची लोकसंख्या वीस लाखांपेक्षा कमी असेल अशा राज्यात मध्यस्तरावरील पंचायतीची स्थापना केली नाही तरी चालेल, अशी सवलत देण्यात आली आहे.

७३व्या घटनादुरुस्ती कायद्यानंतरही ग्रामीण शासनाची उद्दिष्ट्ये साध्य न होणे.

1] या संस्थावर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्य शासनाची दृष्टी दोषपूर्ण आहे. बरेचदा क्षुल्लक कारणासाठी या संस्था राज्य शासनाकडून बरखास्त केल्या जातात.

2] स्थानिक शासनसंस्था उच्च जातीच्या गटांचे व आर्थिकदृष्ट्या संघटीत गटांचे वर्चस्व असते असे दिसून येते.

3] स्थानिक शासनसंस्थाना पुरेसा आर्थिक निधी कधीच उपलब्ध होत नाही. आर्थिकदृष्ट्या दुबळे राहिल्याने स्थानिक प्रगतीसाठी या संस्थाना फार काही करता येत नाही.

4] अनेक राज्यात राजकारणाचे मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीकरण झाले आहे. आर्थिक ताकद असलेले गुंडगिरी करून लोकांची मते विकत घेऊन या संस्थांवर ताबा मिळवतात. खेड्यातील ग्रामीण जनतेसाठी मते विकण्याचे साधन म्हणजे पंचायती व्यवस्था बनली आहे.

5] लोकप्रतिनिधी प्रशासकीय कार्यात ढवळाढवळ करतात तर प्रशासकीय अधिकारी आपल्या स्वार्थी हितसंबंधांच्या जपणुकीसाठी राजकारण करू लागतात. त्याचा परिणाम म्हणून स्थानिक कार्य, विकास दुर्लक्षितच राहतो.

BEN 10
colors
GOLD
PPCG_10

Topic :



Date :

6] स्थानिक पातळीवर जी कामे होतात त्यांच्यात प्रचंड भ्रष्टाचार होतो. गावातील कामांचे ठेके स्थानिक नेत्यांच्या नातेवाईकानांच मिळतात. तसेच कोणतेही काम पैसे दिल्या-घेतल्याशिवाय होत नाही. भ्रष्टाचारामुळेच स्थानिक पातळीवर विकासाचे उद्दिष्ट्ये गाठताना अपयश येते.

वर उल्लेखलेल्या मुद्दयाच्या आधारे 73 व्या घटनादुरुस्ती कायदयानंतरही ग्रामीण शासन प्रशासनाचे उद्दिष्ट्ये का साध्य होत नाही हे लक्षात येऊ शकते.

BEN 10
colors
GOLD
PPCG_10

# संदर्भसूची

प्रा बॉटरशेड - 73 वी घटना दुरुस्ती - ऑर्गनायझेशन ट्रस्ट

प्रा बॉटरशेड - घटनादुरुस्तीच्या मुख्य उद्देश व 73 व्या घटनेत करण्यात आलेला बदल - ऑर्गनायझेशन ट्रस्ट

प्रा केतन भोसले - सर्वसामान्य माणसाला विकासकाम व नियोजनात सहभाग देणारा कायदा - राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक

प्रा केतन भोसले - 73 व्या घटनेची ठळक वैशिष्ट्ये - राजशास्त्र विषयाचे प्राध्यापक

colurs
BEN 10
GOLD
PPCG_10

Topic :

Page :

Date :

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की 1) सावंत वर्षा वसंत, 2) सावंत प्रतिक्षा किशोर, 3) शेवाळे मेहेक महमदहानिफ, 4) शिंदे शुभम रंगराव, 5) शिंदे तेजस संभाजी या विद्यार्थ्यांनी 'राज्यशास्त्र अभ्यास' या विषयाअंतर्गत सादर प्रकल्प अहवाल आपापले विषयांचे प्रकल्प या प्रवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे व माझ्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणा-त्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण -: विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक -: 5-7-2021

प्राचार्य

मार्गदर्शक
प्रा. डी.पी. पवार
प्रा. समीक्षा फराकटे

Farakate
S. A. Farakate

HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

colors BEN 10 GOLD PPCG_10